**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**November 2020 Special Issue- 29 Vol. I**

# Human Rights

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Shaurya Publication, Latur**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 29 Vol I**

**Title of the issue : - Human Rights**

© **All rights reserved with the College & publisher Price : Rs. 400/-**

**Editor – Arun Godam**
**Latur**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

EDITION :
November. 2020

37. **भक्तिकालिन हिंदी साहित्य मे मानवतावाद** 106

प्रा. डॉ. शंकर गंगाधर शिवशेट्टे

38. **समकालीन हिन्दी कविता में पर्यावरण विमर्श** 109

मुजावरएस.टी.

39. **हरिश गोयल की विज्ञानकथा संजीवनी** 112

डॉ. बी. आर. नळे

40. मनवाधिकार, स्वतंत्रता आन्दोलन और मध्यमवर्ग 115

राजेश कुमार सिन्हा

41. **मानवी हक्क अपेक्षा आणि वास्तव** 118

डॉक्टर भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी

42. **दुनिया में मानवाधिकार आंदोलन का इतिहास** 120

डॉ. गंगणे अमोल , डॉ. दळवे अरुण

43. **"मानवी हक्काचा इतिहास आणि वाटचाल"** 123

**प्रा.डॉ.त्रिंबक भिमराज राजदेव**

44. मानवी हक्क आर्य समाज सत्याग्रह चळवळ : एक अभ्यास 127

प्रा.डॉ.रामभाऊ देवराव काशीद

45. कोव्हीड-१९ आणि मानवाधिकार 130

प्रा.डॉ.रमेश वाघमारे

46. मानवी अधिकार आणि सार्वजनिक धोरण. 133

प्रा. दिक्षित साहेबराव ज्ञानोबा

47. शाश्वत विकास एक अभ्यास 136

डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड

48. मानवी हक्क आणि सद्यकालीन प्रश्न 139

डॉ.आरडले एस.डी.

49. सभ्य समाज आणि मानवी हक्क 142

डॉ. भालेराव जे.के.

50. मानवी हक्क आणि सुशासन 144

डॉ. वैशाली शेषराव पेरके

51. दहशतवाद आणि मानवी अधिकार 146

प्रा.डॉ.आचार्य आर.डी.

52. मानवी हक्क आणि सामाजिक न्याय 148

प्रा.अशोक रा.गोरे

53. मानव अधिकार: एक परिचय 150

प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ

# Editorial Board

**Guest Editor : Principal& ConvenerDr .KishanPawar**

Co-editors:

Sudhir M .Pokale- Co-convener

Sanjay B. Salunke-IQAC Coordinator

Satish K Bhalerao-

Dr.Sachidanand K. Tandale

Dr.Govind S. Pandav

Ashok S.Khetri

Dr.Manisha D.Sasane

Dr. Ramhari B. Maykar

Dr. B.G.Kulkarni

Dr. Mahesh Rajenimbalkar

Devidas E. Dadpe

**विषय विश्लेषण :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मानवी हक्क आणि सामाजिक न्याय या संकल्पनांना मोठे महत्व प्राप्त झाले आहे. जागतिक पातळीवर मानवी हक्क आणि सामाजिक न्याय ह्या संकल्पनांसाठी अनेक संस्था व चळवळी कार्यरत असलेल्या दिसून येतात. मानवी हक्क किंवा मानव अधिकार हे मानवाचे मुलभूत हक्क आहेत. मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांना समान असतात. मानवी हक्कांमध्ये प्रामुख्याने खालील हक्कांचा समावेश होतो.

- जीवनाधिकार
- यातनांपासून मुक्तता
- गुलामगिरीपासून मुक्तता
- भाषण स्वातंत्र्य
- वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य

१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने पॅरिस येथे मानव अधिकाराचे वैश्विक घोषणपत्र संमत केले. घोषणपत्रानुसार सर्व मानवी व्यक्ती जन्मत: स्वतंत्र आहेत. व्यक्ती, समुहाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा भेदभाव अमान्य आहे. गुलामगिरी व गुलामांचा व्यापारास बंदी, समान संरक्षण मिळविण्याचा हक्क, कायदेशीर संरक्षण, राष्ट्रीयत्व, मालमत्ता धारण करण्याचा अधिकार, धर्म निवडण्याचा अधिकार, विश्रांती व आराम मिळण्याचा अधिकार इत्यादींचा समावेश आहे.

समताधिष्ठित व न्याय्य समाजाच्या निर्मितीसाठी मानवी अधिकारांप्रमाणेच सामाजिक न्यायाची भूमिका देखील महत्वपूर्ण आहे. सामाजिक न्यायाचे दोन प्रकार आहेत.

१. औपचारिक न्याय :- न्यायसंस्था व कायद्यांमधील तरतुदींचा समावेश

२. अनौपचारिक न्याय :- नैतिकता व राजकीय परिस्थितीशी संबंधित

जागतिक पातळीवर सर्वसमावेशक विकास आणि सर्वांगिण प्रगती हा उद्देश सामाजिक न्याय ह्या संकल्पनेचा आहे. दारिद्र्य, बेकारी, वर्णभेद, लिंगभाव विषमता, जातीभेद, धर्मभेद, शिक्षणाची असमानता, सामाजिक व आर्थिक विषमता यामुळे सर्वसमावेशक विकासाची प्रक्रिया साध्य होताना दिसत नाही. सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी 'सामाजिक न्याय' ही प्रक्रिया अधिक गतिमान करणे आवश्यक आहे. वेठबिगारी व गुलामगिरी यापासून मुक्त समाज हे ध्येय 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचे आहे. उपेक्षित-वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ठ करण्यासाठी सामाजिक न्याय माध्यम आहे. सामाजिक न्यायामुळे सामाजिक असंतोष कमी होण्यास मदत होते.

**निष्कर्ष :-**

१) मानवी हक्क व सामाजिक न्याय एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे आहेत.

२) मानवी हक्क व सामाजिक न्याय ह्या निरंतर चालणाऱ्या प्रक्रिया आहेत.

३) लोकशाही मार्गाने मानवी हक्क व सामाजिक न्यायाची पूर्तता होऊ शकते.

४) असंघटीत क्षेत्रात मानवी अधिकार व सामाजिक न्याय याबाबत कामाची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**


१) 'राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना'- प्रा.डॉ.शैलेंद्र देवलाणकर

२) 'राजकीय सिध्दांत'- प्रा.श्रीकांत देशपांडे

३) 'मानवी हक्क'- प्रा.व्ही.बी.पाटील, के सागर पब्लिकेशन्स, पुणे.

४) 'मानवी हक्क आणि सामाजिक न्याय'- प्रा.पी.के.कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

५) 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र'- डॉ.बी.एम.कऱ्हाडे, पिंपळापुरे पब्लिशर्स, २०११

# CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 29 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| November 2020 | SJIF | Impact Factor : 7.139 |

# मानवी हक्क आणि सामाजिक न्याय

**प्रा.अशोक रा.गोरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

---

**प्रास्ताविक :-**

सर्वसाधारणपणे विसाव्या शतकापासून मानव अधिकार किंवा मानवी हक्क ही संकल्पना जगातील अनेक देशांमध्ये चर्चेचा विषय बनली. मानवी हक्क ही संज्ञा १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्क चळवळीला प्राप्त झाली. हा दिवस मानवी हक्क दिवस म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. दुसऱ्या महायुध्दाने जागतिक शांततेला आव्हान निर्माण केले होते. जगात शांतता निर्माण करण्याचा उद्देश समोर ठेवून २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याबरोबरच मानवी अधिकार आणि स्वातंत्र्य या तत्त्वांचा पुरस्कार केला. संयुक्त राष्ट्र संघाने २५ एप्रिल १९४५ ते २६ जून १९४५ दरम्यान अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे परीषदेचे आयोजन करुन एकूण ११ प्रकरणे असलेली १११ कलमांची सनद तयार केली व त्यात मानवी हक्कासंबंधी अनेक तरतुदी केल्या. मानवाच्या मूलभूत हक्कांचा विचार अनेक वर्षांपासून होत असला तरी अनेक राष्ट्रांनी मानवी हक्काला मान्यता देवून त्या हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी अलिकडच्या काळात स्वीकारली आहे. मानवी हक्कांमध्ये जगण्याचा, अन्न, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती हिंसेपासुन स्वातंत्र्य यांचा समावेश होतो.

न्याय ही विविधांगी संकल्पना आहे. स्वातंत्र्य, बंधुता आणि समता ही न्यायाची अविभाज्य अंगे आहेत. ख्रिस्तपूर्व काळात ग्रीक तत्त्ववेत्ते प्लेटो, ॲरिस्टॉटल त्यानंतर जॉन रॉल्स आणि कार्लमार्क्स यांनी न्यायाच्या संकल्पनेबाबत आपले मौलिक विचार मांडले आहेत. सामाजिक न्याय ही मोठी आणि सतत चालणारी प्रक्रिया आहे. समाजात अद्यापही सामाजिक न्याय पूर्णपणे प्रस्थापित झालेला नाही. सामाजिक न्याय म्हणजे शोषणविरहित, समताधिष्ठित, न्याय्य समाजाची निर्मिती होय. सामाजिक न्याय ही नीतिमूल्यांवर आधारलेली संकल्पना आहे. सामाजिक जीवनातील केंद्रस्थानी असलेले नैतिकतेचे प्रमाण सामाजिक न्यायात अभिप्रत असते. प्रस्थापित झालेले सामाजिक सिध्दांत आणि सामाजिक क्रिया या दोन्हीमध्ये सामाजिक न्यायाची भूमिका अनन्यसाधरण स्वरूपाची असते. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, आर्थिक, राजकीय-सामाजिक हक्क, स्त्री-पुरूष समानता, शिक्षणाच्या समान संधी, विकासाच्या समानसंधी ही सामाजिक न्यायाची उद्दिष्टे आहेत.

**मानवी हक्क अर्थ :-**

१) प्रो.लास्की :- "हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती की ज्याशिवाय व्यक्तीला स्वत:चा विकास करून घेणे अशक्य असते."

२) डॉ.वाघमारे :- "जगण्याचा अधिकार हा मानवाला निसर्गाने दिलेला मुलभूत अधिकार आहे. नैसर्गिक न्यायाची कल्पना ही या अधिकारावर आधारलेली आहे."

**सामाजिक न्याय अर्थ :-**

१) "सामाजिक न्याय म्हणजे शोषण विरहित, समताधिष्ठीत, न्याय्य समाजाची निर्मिती होय."

२) "सामाजिक न्याय म्हणजे समानता, ऐक्य, बंधुत्व या तत्वावर आधारीत समताधिष्ठीत समाजाची निर्मिती होय."

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१) मानवी हक्काची संकल्पना लक्षात घेणे.
२) मानवी हक्काचे स्वरुप व महत्व लक्षात घेणे.
३) सामाजिक न्यायाची संकल्पना अभ्यासणे.
४) सामाजिक न्यायाचे महत्व लक्षात घेणे.

**शोधनिबंधाची गृहितके :-**

१) मानवी हक्क ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे.
२) मानवी हक्क ही संकल्पना व्यापक आहे.
३) सामाजिक न्यायाची संकल्पना व्यापक आहे.
४) सामाजिक न्याय ही बहु आयामी संकल्पना आहे.
५) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय परस्परावलंबी संकल्पना आहेत.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनांवर आधारीत आहे. विविध संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, विविध नियतकालिके व संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.